नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २९६ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




रविवार दि. ११ ऑक्टोंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी पाण्याचा प्रत्येक थेंब अडवणार : मुख्यमंत्री

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने, नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीने काम करावे. ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ या संकल्पनेला प्राधान्य देऊन पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब अडविण्यासाठी जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवावीत. पानी फाउंडेशनसह विविध स्वयंसेवी संस्थांच्या कामांना प्रशासकीय यंत्रणेने सक्रिय सहकार्य करून जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी समन्वयातून या मोहिमेला गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिले.

यावर्षी राज्यात वॉटर कप अभियान लवकर सुरू होत असून, या पार्श्वभूमीवर वर्षा निवासस्थानी आयोजित जलसंधारणविषयक बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दुष्काळाच्या आव्हानावर मात करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. यापूर्वी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी आणि क्षेत्रीय यंत्रणेने विविध कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत उत्तम नेतृत्व व कार्यक्षमता दाखविली आहे. अडचणीच्या काळात प्रशासकीय यंत्रणा उत्साहाने आणि जबाबदारीने कामाला लागल्यास कामाचा वेग वाढतो, हे आपण अनुभवले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पहाटेपासून काम सुरू असल्याचे चित्र यापूर्वी दिसले आहे. त्याच कार्यतत्परतेने आणि समर्पित भावनेने आता जलसंधारणाच्या कामांसाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

जलसंधारणाच्या कामांसाठी या बैठकीत निश्चित झालेल्या संकल्पनांच्या आधारे एकात्मिक कार्ययोजना तयार करावी. तिच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सक्षम प्रशासकीय यंत्रणा उभारण्याबरोबरच कामांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाधारित संनियंत्रण प्रणाली विकसित करावी. विविध विभागांच्या कामांचे एकत्रीकरण करून परस्पर समन्वयातून अंमलबजावणी करावी. सर्व संबंधित यंत्रणांनी सक्रिय सहभाग घेत कामांना विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

जलसंधारणाची कामे केवळ कागदावरील नियोजनापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्षात परिणामकारकपणे पूर्ण झाली पाहिजेत. पहिला पाऊस पडताच पाणी अडविण्यासाठी जलसंधारणाच्या संरचना सज्ज असतील आणि त्यातून भूजलपातळीत वाढ होण्यास मदत होईल, अशा पद्धतीने कामांचे नियोजन व अंमलबजावणी करावी. या प्रयत्नांतून गावांना दुष्काळमुक्त करण्याच्या दिशेने ठोस पावले टाकता येतील आणि जनतेला मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. जलसंधारणाची ही महत्त्वपूर्ण मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्व अधिकारी आणि संबंधित यंत्रणांनी एकजुटीने सहभागी व्हावे आणि या मोठ्या लढाईसाठी सज्ज व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. या बैठकीला नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, ए.टी.ई. चंद्रा फाउंडेशनचे अमित चंद्रा, पानी फाउंडेशनचे सत्यजित भटकळ, अभिनेते आमिर खान, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन–नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर,




जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते. पशुसंवर्धन विभागाचे सचिव एन. रामास्वामी तसेच राज्यातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

## माता आशापुरा देवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी २७ वर्षांपासून अखंड सेवायज्ञ

**भुज (समर्थ गांवकरी)**

माता आशापुरा देवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या पदयात्री भाविकांच्या सेवेसाठी श्रीमती धनलक्ष्मीबेन नानजीभाई ठक्कर थाणावाला यांच्या समर्पणातून उभारण्यात आलेल्या सेवा शिबिराचा दीपप्रज्वलन सोहळा दिनांक ७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आला. समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर थाणावाला यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी श्री नटवरलाल विरजीभाई ठक्कर, श्री प्रभुलाल हरजीवन मिराणी, श्री महेश वालजीभाई मिराणी, महामंडलेश्वर १००८ देवेंद्रगिरीजी महाराज यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नवरात्रीच्या पवित्र पर्वात माता आशापुरा देवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या यात्रेकरूंसाठी या शिबिरात भोजन आणि विश्रांतीची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, हा सेवायज्ञ गेल्या २७ वर्षांपासून अखंडपणे सुरू आहे.

समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर यांनी सांगितले की, माता आशापुरा देवीच्या दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी श्री कौशिक छाया, त्यांचे कुटुंबीय आणि मित्रपरिवार अनेक वर्षांपासून अहोरात्र मेहनत घेत आहेत. ते तन, मन आणि धन अर्पण करून निःस्वार्थ भावनेने सेवा करत आहेत. त्यांच्यासोबत अनेक दानशूर व्यक्तीही या सेवाकार्यात सहभागी होत आहेत.



गेल्या अनेक वर्षांपासून कोणत्याही अपेक्षेशिवाय सुरू असलेले हे सेवाकार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. असे कार्य करणे प्रत्येकासाठी सोपे नसते. या संपूर्ण सेवाकार्याचा अनुभव आपण स्वतः घेतला असून, या सेवाभावी परिवाराचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

या सेवा शिबिरात यात्रेकरूंसाठी खिचडी, कढी यांसह विविध खाद्यपदार्थांची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, लांबचा पायी प्रवास करून येणाऱ्या भाविकांना विश्रांती घेता यावी, यासाठी आवश्यक सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नवरात्रीच्या काळात मोठ्या संख्येने येणाऱ्या यात्रेकरूंना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सेवाभावी परिवार सातत्याने कार्यरत आहे.

यावेळी महामंडलेश्वर १००८ देवेंद्रगिरी महाराज यांनी सांगितले की, एन.के.टी. ट्रस्ट संपूर्ण भारतात गरजू लोकांपर्यंत सेवा आणि मदत पोहोचविण्याचे कार्य करीत आहे. समाजात शिक्षणाचा प्रसार वाढावा आणि प्रत्येक घर व्यसनमुक्त व्हावे, यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. देवेंद्रगिरी महाराज यांनी या पवित्र सेवाकार्याला आशीर्वाद देत, या कार्यासाठी शक्य ती सर्व मदत व सेवा देण्यास आपण सदैव तयार असल्याचे सांगितले. तसेच, त्यांनी श्री नानजीभाई यांना गांधिधाम येथे येण्याचे निमंत्रण दिले. आमचे मंदिर ऐतिहासिक आहे, आपण अवश्य दर्शनासाठी या, असे आवाहनही त्यांनी केले.

या प्रसंगी अहमदाबाद येथून श्री गोविंदभाई विशेष उपस्थित होते. त्यांनीही श्री नानजीभाई यांच्या समाजसेवेचे कौतुक केले. श्री कौशिक छाया आणि त्यांच्या परिवाराकडून अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या निःस्वार्थ सेवाकार्याचा गौरव करण्यासाठी श्री नानजीभाई ठक्कर थाणावाला, श्री नटवरलाल विरजीभाई ठक्कर, श्री प्रभुभाई ठक्कर, श्री महेशभाई ठक्कर, डी.एस.पी., एस.पी., पोलीस निरीक्षक, महामंडलेश्वर १००८ देवेंद्रगिरी महाराज, त्यांचे शिष्य, साध्वी भगिनी तसेच इतर अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नानी चिरई (कच्छ) येथे धनलक्ष्मीबेन नानजीभाई थाणावाला अन्नक्षेत्राच्या सेवाभावी कार्याचा गौरव

**कच्छ (समर्थ गांवकरी)**

नानी चिरई (कच्छ) येथे धनलक्ष्मीबेन नानजीभाई खीमजीभाई ठक्कर यांच्या वतीने थाणावाला अन्नक्षेत्रामार्फत अत्यंत स्तुत्य सेवा केली जात आहे. नवरात्रीच्या काळात येथे येणाऱ्या यात्रेकरूंसाठी विविध सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महामार्गावर असलेले हे अन्नक्षेत्र दररोज हजारो लोकांसाठी आशीर्वाद ठरत आहे.

या प्रसंगी श्री नानजीभाई खीमजीभाई ठक्कर थाणावाला, श्री नटवरलाल विरजीभाई ठक्कर, श्री प्रभुभाई ठक्कर, श्री महेशभाई ठक्कर, डी.एस.पी., पोलीस निरीक्षक तसेच १००८ देवेंद्रगिरी महाराज, त्यांचे शिष्य, साध्वी भगिनी आणि इतर अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शेठ नानजीभाई ठक्कर यांनी सांगितले की,



साध्वी महाराजश्री यांच्या प्रेरणेने गांधीधाम, भुज यांसह विविध भागांतून पायी येणाऱ्या भाविकांसाठी येथे भोजनासह अनेक सोयी–सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. गेल्या अनेक वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेली ही सेवाभावी परंपरा खरोखरच कौतुकास्पद आहे. या उदात्त सेवाकार्यासाठी साध्वी भगिनींचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.

## एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला डॉ.जयश्रीताई थोरात यांचा पाठिंबा ; दोषींना राजीनामा द्यावाच लागेल

### समाजातील आणि आयोगातील ब्लड कॅन्सर ठीक करायचा आहे : डॉ. जयश्रीताई थोरात

**पुणे (समर्थ गांवकरी)**

पुण्यात एमपीएससीच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात यांनी भेट देऊन आंदोलकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या न्याय मागण्यांना पाठिंबा देत, तुम्ही देत असलेला लढा तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी आहे. स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवा, महाराष्ट्राला पुढे नेण्याची ताकद तुमच्यातच आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच या प्रकरणात दोषींवर जबाबदारी निश्चित करून त्यांनी राजीनामा द्यावा, अशी ठाम भूमिका मांडताना समाजातील व आयोगामधील ब्लड कॅन्सर ठीक करायचा असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पुणे येथे एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन आता चळवळ बनले असून, गेल्या नऊ दिवसांपासून विश्वजित कदम, रोहित पवार, युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांच्यासह अनेक जण विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी प्रयत्नशील आहेत. या आंदोलनाला डॉ.जयश्रीताई थोरात यांनी भेट देऊन पाठिंबा दिला. यावेळी संगमनेर मधील ५० युवक कार्यकर्ते त्यांच्या समवेत होते.

यावेळी बोलताना डॉ.जयश्रीताई थोरात म्हणाले की, आंदोलनादरम्यान गुन्हे दाखल झाले, तरी घाबरू नका; ते आपल्यासाठी मेडल आहे असे समजा. या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या विद्यार्थिनींचे कौतुक करताना त्यांनी त्यांच्या संघर्षाला सलाम केला. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना मुलींना अनेक सामाजिक आणि कौटुंबिक आव्हानांना सामोरे जावे लागते. तरीही त्या आपल्या हक्कांसाठी ठामपणे उभ्या आहेत. पालकांनी व समाजाने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, असे त्या म्हणाल्या.

तर छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांना संघर्षाची प्रेरणा दिली. संत, शाहू, फुले आणि आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे हीच परंपरा आहे. विद्यार्थ्यांनी एकजूट कायम ठेवून आपल्या न्याय्य मागण्यांसाठी लढा सुरू ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले.



मा महसूल व शिक्षणमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांचाही या आंदोलनाला पाठिंबा असल्याचे डॉ.जयश्रीताई थोरात यांनी स्पष्ट केले. आपल्याला समाजातला आणि आयोगातला ब्लड कॅन्सर बरा करायचा आहे, असे स्पष्ट विधान करत त्यांनी परीक्षा व आयोगाच्या व्यवस्थेतील त्रुटी दूर करून विद्यार्थ्यांना न्याय देण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर तातडीने निर्णय घेऊन दोषींवर योग्य कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी आमदार रोहित पवार, माजीमंत्री डॉ.विश्वजीत कदम, आमदार अंबादास दानवे, शिवराज मोरे, विवेकानंद पाटील, प्रियंका, डॉ.ओंकार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



# लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्यातील विविध रस्त्यांच्या कामांसाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर : आ.सत्यजित तांबे



## तालुक्यातील रस्त्यांचे जाळे अधिक भक्कम होणार

संगमनेर (समर्थ गांवकरी)

भौगोलिक दृष्ट्या विस्ताराने मोठ्या असलेल्या संगमनेर तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विकासाच्या योजना राबवल्या गेल्या आहेत. तालुक्यात रस्त्याचे जाळे निर्माण करण्यात आले असून विविध गावांमधील रस्त्याचे मजबुतीकरण कामांसाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाले असल्याची माहिती आमदार सत्यजित तांबे यांनी दिली आहे.

देवकवठे ते बोटा असा १०० किलोमीटरचा विस्तीर्ण असणाऱ्या संगमनेर तालुक्यात पठार भाग, प्रवरा पट्टा व तळेगाव भाग असे भौगोलिक दृष्ट्या तीन विभाग येतात. लोकनेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात १७१ गावे व २५८ वाडी वस्तीवर सातत्याने विविध विकासाच्या योजना राबवण्यात आले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या ३०५४ योजनेअंतर्गत आमदार सत्यजित तांबे यांच्या पाठपुराव्यातून विविध रस्त्यांच्या विकास कामांसाठी २ कोटी रुपयांचा निधी व इतर निधीमधून एक कोटी असे ३ कोटी रुपये रस्त्यांच्या मजबुती करण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निधीमधून चिखली ते जवळे कडलग रस्ता इजीमा ३३ मजबुतीकरण करणे कामासाठी ४० लाख रुपये, जवळे बाळेश्वर रस्ता, सारोळे पठार फाटा ते सारोळे पठार गाव इजीमा ३७ रास्ता मजबुतीकरण कामासाठी २० लाख रुपये, शेंडेवाडी, सतीचीवाडी डोळसणे रस्ता मजबुतीकरण कामासाठी २० लाख रुपये, शेडगाव, मालूंजे,रणखांब, कवठे मलकापूर, वरवंडी फाटा ते खांबे रस्ता मजबुतीकरण कामासाठी २० लाख रुपये असे १ कोटी रुपये

तर जिल्हा नियोजन समितीच्या ३०५० अंतर्गत खांबा ते खरशिंदे रस्ता मजबुतीकरण कामासाठी १० लाख रुपये, कवठे मलकापूर काळे वस्ती रस्ता मजबुती करण्यासाठी १० लाख रुपये डिग्रस ते हजारवाडी रस्ता मजबुतीकरण करणे १० लाख रुपये, पिंपळगाव कोझिरा ते चोथेमळा रस्ता मजबुतीकरण कामासाठी १० लाख रुपये, वडगाव लांडगा येथील जवळे कडलग, वडगाव लांडगा ते नंदनखिंड रस्ता सुधारणा करणे १० लाख रुपये, कृषी उत्पन्न बाजार समिती वडगावपान पोखरी हवेली रस्ता सुधारणे कामासाठी १५ लाख रुपये, साकुर जोगे पठार रस्ता मजबुतीकरण कामासाठी १५ लाख रुपये, कुंभारवाडी ते ठाकरवाडी रस्ता मजबुतीकरण कामासाठी १५ लाख रुपये, वरझडी बुद्रुक ते बोडखेवाडी रस्ता मजबुतीकरण करण्यासाठी १५ लाख रुपये, नांदुरी दुमाला ते पतीगे बाबा रस्ता मजबुतीकरण कामासाठी १५ लाख रुपये, खांडगाव ते गणेशवाडी,गोडसेवाडी रस्ता मजबुतीकरण कामासाठी २० लाख रुपये, मांडवे बुद्रुक हवालदार वस्ती ते जोगे पठार घाट रस्ता मजबूती करण्यासाठी २० लाख रुपये, धांदरफळ खुर्द येथील धांदरफळ खुर्द माणकेश्वर मळा ते गोडसेवाडी रस्ता मजबूती करण्यासाठी २० लाख रुपये असे दोन कोटी रुपये अशा एकूण तीन कोटी रुपयांच्या निधीमधून या रस्त्यांचे मजबुतीकरण होणार आहे.

या रस्त्यांच्या मजबुतीकरण कामामुळे संगमनेर तालुक्यातील रस्त्यांचे जाळे अधिक भक्कम होणार असून ग्रामीण भागातील नागरिकांना दळणवळणाची मोठी सोय होणार आहे. गावोगावच्या रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांचे वरील विविध गावांमधील नागरिक युवक व महिलांनी अभिनंदन केले आहे.

### रस्त्यांचे जाळे अधिक मजबूत होणार : आमदार तांबे

संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा असून म ाजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली या तालुक्यात सातत्याने विकासाच्या योजना राबवल्या गेल्या आहेत. ग्रामीण विकास, शेती, सहकार,शिक्षण,व्यापार अशा सर्व गोष्टींमध्ये संगमनेर तालुका हा राज्यात प्रगतशील असून ग्रामीण भागातील विविध रस्त्यांकरता मिळालेल्या या निधीमधून या रस्त्यांचे मजबुतीकरण होणार असल्याने नागरिकांना दळणवळणाची मोठी सोय होणार आहे. याचबरोबर इतरही तालुक्यांमध्ये शिक्षणाबरोबर विविध विकास कामांसाठी निधी मिळवला असून हे सर्व कामे गुणवत्तापूर्ण होऊन नागरिकांना चांगली सुविधा मिळेल.

**आमदार सत्यजित तांबे**

# नवरात्री देवीच्या कथा, मालिकेतील कथा पहिली, कथा नवरात्रीच्या

**वृत्त संकलन, कोतुळ प्रतिनिधी अशोकराव शेळके**

**पहिली माळ शैलपुत्री**

शैलपुत्री देवी ही नऊ दुर्गांपैकी पहिली देवी आहे. घटस्थापनेच्या (नवरत्रीच्या) पहिल्या दिवशी माता शैलपुत्रीची पूजा केली जाते.

**माता शैलपुत्रीची कथा:**

पौराणिक कथेनुसार, मागील जन्मी या देवीचे नाव 'सती' होते आणि शैलपुत्री या राजा दक्ष प्रजापतीच्या कन्या होत्या. त्यांचा विवाह भगवान शंकराशी झाला होता. एकदा राजा (दक्ष) यांनी एका मोठ्या यज्ञाचे आयोजन केले , ज्यामध्ये त्यांनी सर्व देवी-देवतांना आमंत्रित केले होते, परंतु जावई भगवान शंकर आणि कन्या सती यांना बोलावले नाही

सतीला आपल्या पित्याच्या यज्ञात जाण्याची तीव्र इच्छा होती. त्यांनी भगवान शंकराला समजावण्याचा प्रयत्न केला, पण शंकरांनी न जाण्याचा सल्ला दिला. तरीही सती कुणाचेही ऐककल्याशिवाय एकट्याच माहेरी गेल्या. तिथे गेल्यावर त्यांना कळले की कोणीही त्यांच्याशी आदराने बोलत नाहीये आणि त्यांच्या पतीचा (भगवान शंकर) अपमान केला जात आहे. हे सहन न झाल्यामुळे माता सतीने त्याच यज्ञाच्या कुंडात स्वतःला भस्मसात केले (आत्मदहन केले).

यानंतर, सतीने हिवाळ्याचा राजा, म्हणजेच पर्वतराजा 'हिमालय' यांच्या घरी कन्या म्हणून पुनर्जन्म घेतला. पर्वताची राजकन्या असल्यामुळे त्यांना 'शैलपुत्री' (शैल = पर्वत, पुत्री = कन्या) असे नाव पडले. या जन्मातही त्यांनी कठोर तपस्या करून पुन्हा भगवान शंकरालाच आपल्या पती म्हणून प्राप्त केले.

**माता शैलपुत्रीचे स्वरूप:**

माता शैलपुत्रीच्या उजव्या हातात त्रिशूळ आणि डाव्या हातात कमळाचे फूल असते. त्या नंदी नावाच्या बैलावर आरूढ असतात, म्हणूनच त्यांना *वृषारुढा*असेही म्हणतात.


माळ पहिली,, शैलपुत्री देवी

# अगस्ती विद्यालयात वाचन सप्ताहानिमित्त प्रश्नमंजुषा उपक्रम उत्साहात संपन्न!

## वाचन संस्कृती रुजविण्यासाठी ग्रंथालय विभागाचा स्तुत्य उपक्रम

अकोले (समर्थ गांवकरी)

भारतरत्न, माजी राष्ट्रपती व थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर हा दिवस देशभरात 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून अगस्ती विद्यालय, अकोले येथे विद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्यातील ज्ञानाची व्याप्ती वाढावी आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, यासाठी विविध शैक्षणिक व बौद्धिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.




या उपक्रमांच्या मालिकेत शनिवार, दिनांक १० ऑक्टोबर २०२६ रोजी विद्यालयात प्रश्नमंजुषा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानाला चालना मिळण्याबरोबरच त्यांच्यातील जिज्ञासा, आकलनशक्ती आणि वाचनातून मिळवलेल्या ज्ञानाची पडताळणी करण्याची संधी उपलब्ध झाली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यालयाचे प्राचार्य आदरणीय शिंदे सर यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारांना योग्य दिशा मिळते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकांबरोबरच अवांतर वाचनाची सवय जोपासून ज्ञानाच्या विविध क्षेत्रांत प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यालयाच्या ग्रंथालय विभागाचे प्रमुख श्री. काळे जी. आर. यांच्या मार्गदर्शनाखाली वाचन सप्ताहांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी या उपक्रम ांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून वाचनाची गोडी निर्माण करावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.'वाचाल तर वाचाल' या विचाराला कृतीची जोड देत अगस्ती विद्यालयाचा ग्रंथालय विभाग विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, जिज्ञासा आणि वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते .

# घंटागाडी येत नसल्याने शिवसेनेचे नगरसेवक उतरले रस्त्यावर; स्वतः केले कचरा संकलन

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा शहरातील विविध भागांत घंटागाडी नियमितपणे येत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यासंदर्भात लेखी निवेदन देऊन तसेच वारंवार विनंती करूनही कचरा संकलनाची समस्या कायम असल्याने अखेर नाइलाजाने शिवसेनेच्या नगरसेवकांनी स्वतः रस्त्यावर उतरून कचरा संकलन करण्याचा पुढाकार घेतला.




शहरातील अनेक भागांत घंटागाडी वेळेवर येत नसल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. स्वच्छतेच्या प्रश्नावर वारंवार प्रशासनाचे लक्ष वेधूनही अपेक्षित सुधारणा होत नसल्याने नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी शिवसेनेचे नगरसेवक स्वतः कचरा संकलनासाठी रस्त्यावर उतरले.

या उपक्रमावेळी नगरसेवक ॲड. सुशीलकुमार शिंदे, नगरसेवक पांडूशेठ पोटे, नगरसेवक अनिल महाराज औटी तसेच नगरसेवक अख्तर भाई शेख यांचे चिरंजीव आतिफ शेख उपस्थित होते.

यावेळी नगरसेवकांनी शहरातील स्वच्छतेच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली. जनतेच्या सेवेसाठी निवडून आलेले लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांना होणारा त्रास दूर करणे ही आपली जबाबदारी असल्याची भूमिका त्यांनी मांडली.

श्रीगोंदा शहरातील ज्या भागांत घंटागाडी येत नाही, त्या भागातील नागरिकांनी संपर्क साधावा. संबंधित भागात स्वतः येऊन कचरा संकलन करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आवाहन नगरसेवकांनी केले.

शहरातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने घंटागाडी नियमितपणे सुरू करावी, सर्व भागांत वेळापत्रकानुसार कचरा संकलन करावे आणि नागरिकांची गैरसोय तातडीने दूर करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# महाराजा कॉलेजचे थलेटिक्स स्पर्धेत यश ज्ञानेश्वरी तोरकड विभागीय स्पर्धेसाठी निवड

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

दिनांक ०८ व ०९ ऑक्टोबर २०२६ रोजी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सीनियर कॉलेज लोणी प्रवरानगर संगमनेर येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय थलेटिक्स स्पर्धेमध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय श्रीगोंद्याची थलेटिक्स खेळाडू ज्ञानेश्वरी तोरकड हिने जिल्हास्तरीय शालेय भालाफेक व गोळा फेक या दोन्ही खेळ प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक मिळवला व ज्ञानेश्वरी ची १५ ऑक्टोबर २०२६ रोजी बालेवाडी येथे पुणे येथे होणाऱ्या शालेय अथलेटिक्स विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली

या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन मा. आ. बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. बाबासाहेब भोस, मा. आ. राहुल जगताप, सदस्य महावीर पटवा, क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, वरिष्ठ उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, ज्युनिअर उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, विभागप्रमुख प्रा उषा बोरुडे, प्रा विजय मगर, प्रा संदीप दरेकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.




# अर्धापूर व मुदखेड तालुक्यात मोफत बियाणे व चारा पाण्याची उपाययोजना करण्याची माजी मुख्यमंत्र्यांकडे मागणी

## दुष्काळाच्या सावटाखाली शेतकरी व जनावरांच्या प्रश्नावर लक्ष वेधले

अर्धापूर (समर्थ गांवकरी)

राज्यावर पुन्हा एकदा भीषण दुष्काळाचे सावट पसरत चालले असून, डिसेंबरनंतर मुक्या जनावरांच्या चारा आणि पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर होणार आहे. या पार्श्वभूमीवर, अर्धापूर व मुदखेड तालुक्यात रब्बी हंगामात चाऱ्याच्या पिकांसाठी मोफत किंवा अनुदानावर बियाणे उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करणारी निवेदन भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे पाटील या माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांना देण्यात आले आहे.

नागोराव भांगे यांनी दिलेल्या या निवेदनात म्हटले आहे की, अर्धापूर आणि मुदखेड तालुका सुदैवाने उरध्व पैनगंगा प्रकल्पाच्या (इसापूर धरण) पाण्यामुळे बागायती असून, येथे पाण्याची उपलब्धता आहे. या भागातील शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन चाऱ्याच्या पिकांसाठी बियाणे उपलब्ध करून दिल्यास शेतकरी चारा पिके घेण्यासाठी पुढे सरसावतील. तसेच शासनाने या चाऱ्याची खरेदी करण्याची हमी देऊन आधीच करार केल्यास, यामुळे एकाच वेळी दोन महत्त्वाचे प्रश्न सुटणार आहेत.वेळ निघून जाण्यापूर्वी प्रशासकीय स्तरावर तातडीने पावले उचलून, राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे हा विषय मांडून योग्य तो धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्या व मुद्दे:

भविष्यात संपूर्ण राज्याला सतावणारा भीषण चारा टंचाईचा प्रश्न मार्गी लागेल आणि मुक्या जनावरांचे प्राण वाचतील. दुष्काळाच्या छायेत जगणाऱ्या अर्धापूर-मुदखेड भागातील शेतकरी आणि शेतमजुरांना हक्काचा रोजगार व आर्थिक आधार मिळेल.

# चारा टंचाईवर मात करण्यासाठी मुरघास निर्मिती व निकृष्ट चारा सकस करण्याचे प्रात्यक्षिक

**घागरदरा येथे शेतकरी व पशुपालकांना चारा व्यवस्थापनाचे मार्गदर्शन; हिरव्या चाऱ्यापासून मोफत मुरघास निर्मितीची सुविधा**

**उपलब्ध चाऱ्याचा कार्यक्षम वापर करण्याचे आवाहन**

नांदेड (समर्थ गांवकरी)

संभाव्य चारा टंचाईवर मात करून पशुधनासाठी वर्षभर सकस चारा उपलब्ध व्हावा, या उद्देशाने चारा साक्षरता अभियानांतर्गत कंधार तालुक्यातील घागरदरा येथील संत नामदेव महाराज गोशाळेत मुरघास निर्मिती, निकृष्ट चारा सकस करणे तसेच पर्यायी चारा उत्पादनाचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. यावेळी शेतकरी व पशुपालकांना उपलब्ध चाऱ्याचे योग्य व्यवस्थापन, संवर्धन आणि पशुधनाच्या पोषणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत सन २०२१-२२ मध्ये ५० टक्के अनुदानावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या सायलेज बेलर यंत्राच्या साहाय्याने मका व नेपियर गवतापासून मुरघासाच्या गाठी आणि ड्रममध्ये मुरघास तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. हिरवा चारा मुबलक असताना त्याचे योग्य पद्धतीने संवर्धन करून टंचाईच्या काळात पशुधनासाठी वापरता येते, याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली.

तसेच वाळलेल्या सोयाबीनच्या कुटारावर युरिया-मोलॅसिस प्रक्रिया करून त्याची पौष्टिकता वाढविण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. हायड्रोपोनिक्स पद्धतीने चारा उत्पादन आणि अझोला उत्पादनाचेही प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

उपलब्ध हिरवा चारा, वाळलेला चारा आणि कडबा यांचा कडबाकुट्टी यंत्राद्वारे योग्य वापर करणे, मुरघास निर्मितीचे तंत्रज्ञान अवलंबणे तसेच गाळपेरा क्षेत्रात चारा पिकांच्या लागवडीचे नियोजन करणे, याबाबत शेतकरी व पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमामुळे उपलब्ध चाऱ्याचा अपव्यय टाळून त्याचे दीर्घकाळ संवर्धन करणे आणि पशुधनाला टंचाईच्या काळातही सकस आहार उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

हिरवा चारा आणल्यास मोफत मुरघास निर्मिती

या उपक्रमावेळी श्री संत एकनाथ नामदेव महाराज यांनी परिसरातील शेतकरी व पशुपालकांनी आपला हिरवा चारा गोशाळेत आणून दिल्यास सायलेज बेलर यंत्राच्या साहाय्याने मोफत मुरघास तयार करून देण्यात येईल, अशी घोषणा केली. या सुविधेमुळे परिसरातील शेतकऱ्यांना हिरव्या चाऱ्याचे योग्य संवर्धन करण्यास मदत होणार आहे.




या वेळी नामदेव महाराज संस्थान, उमरज येथील श्री संत एकनाथ नामदेव महाराज, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. सखाराम खुणे, सहाय्यक आयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, कंधार तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. दिनेश महेर, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत भालके व डॉ. गणेश पाटील, भागवत परगे, पशुधन पर्यवेक्षक प्रतापसिंग पुजारी, गणपत मिसे, नागेश मुत्तेपवार, डॉ. तुषार राठोड, डॉ. सुशील कवडे, अनंत जानापुरे, अक्षय राठोड यांच्यासह परिसरातील शेतकरी व पशुपालक उपस्थित होते.

चारा साक्षरता अभियानाच्या माध्यम ातून चाऱ्याचे संवर्धन, निकृष्ट चारा सकस करणे, पर्यायी चारा उत्पादनाला प्रोत्साहन देणे आणि पशुधनासाठी वर्षभर पुरेसा व पौष्टिक चारा उपलब्ध करून देणे यावर भर देण्यात येत आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### श्री.कालभैरवनाथ नगर (उदापुर) होणार पारायण सोहळा

जुन्नर (समर्थ गांवकरी)

उदापूर ता:-जुन्नर येथील नवरात्रोत्सवघटस्थापने निमित्त श्री काळभैरवनाथ भजन मंडळातर्फे ५१ वा अखंड हरिनाम सप्ताहाचे व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजनकरण्यात आले आहे. रविवार दि:-११ ऑक्टोबर ते मंगळवार दि:- २० ऑक्टोबर या दरम्यान हा सुवर्ण म होत्सवी सोहळा रंगणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत शिंदे व शशिकांत शिंदे यांनी दिली. या हरिनाम सप्ताहात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन,सकाळी ८ ते १२ गाथा व ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १ ते २ नेमाचे भजन,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ,६ ते ७ महा आरती,७ ते रात्री ९ हरिकीर्तन व रात्री १० नंतर हरिजागर होईल. या सोहळ्यात अनुक्रमे प्रसाद वाबळे :-वडगावसहाणी गणेश वाघमारे:-ओझर,शंकर शिंदे:-मुरबाड,दर्शन कबाडी:-कबाडवाडी, नितीन गोडसे:- कोतूळ,नीलेश महाकाळ:-मांदारणे,रोहिदास हारदे:- मांडवे,अनिल चव्हाण:-वडज आणि दत्तात्रय रूकारी:- सात गाव पठार यांची कीर्तनेहोतील विजयादशमीला सकाळी १० ते १२ या वेळेत मनोहर सिनारे राहुरी यांचे काल्याचे कीर्तन होईल.भाविकांनी या सोहळ्या चा लाभ घ्यावा,असे आवाहन श्री काळभैरवनाथ भजन मंडळ व ग्रामस्थांनी केले आहे

### मुंबईतील कोळीवाड्यांचे सीमांकन तीन महिन्यांत पूर्ण करणार

#### महसूलमंत्री बावनकुळेंची घोषणा

मुंबई (समर्थ गांवकरी)

मुंबई शहरातील सात कोळीवाड्यांच्या सीमांकनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाने उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. कोकण विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील ही समिती सीमांकनाच्या मोजणी नकाशांवर प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार करून तीन महिन्यांच्या आत शासनाला शिफारस अहवाल सादर करणार आहे. मुंबईतील शिवडी, सायन, कुलाबा, माहिम (माहिम मार्केटसह), मांडवी-प्रिन्सेस डॉक, वरळी आणि कफ परेड या सात कोळीवाड्यांच्या सीमांकनाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. मुंबईतील कोळीवाड्यांच्या सीमांकनासाठी यापूर्वी प्रत्यक्ष स्थळपाहणी व मोजणी करून नकाशे तयार करण्यात आले होते. या नकाशांमध्ये दर्शविलेल्या सीमांबाबत विविध प्राधिकरणांकडून हरकती नोंदविण्यात आल्या होत्या. त्यामुळे सीमांकन अंतिम करण्यासाठी शासनाने समिती गठित करण्याचा निर्णय घेतला आहे. कोकण विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील या समितीत जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे; बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (शहर); मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हाधिकारी; शहर अभियंता नगर अभियंता खाते बृहन्मुंबई महानगरपालिका, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे संचालक; तसेच मत्स्यव्यवसाय विभागाचे सहायक आयुक्त यांचा समावेश आहे. कोकण प्रदेशाचे उपसंचालक, भूमी अभिलेख हे समितीचे सदस्य सचिव आहेत. समिती मुंबई शहर जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाने तयार केलेल्या सात



कोळीवाड्यांच्या सीमांकनाच्या मोजणी नकाशांचा विचार करेल. या नकाशांवर प्राप्त झालेल्या हरकतींबाबत संबंधित हरकतदार आणि कोळी संघटनांच्या प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेण्यात येणार आहे. त्यानंतर सीमांकन अंतिम करण्याबाबत शासनाला शिफारस केली जाईल. याशिवाय, महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली ९ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाहीचाही समिती विचार करणार आहे. गरजेनुसार संबंधित अधिकारी आणि तज्ज्ञ व्यक्तींना बैठकीसाठी निमंत्रित करण्याचे अधिकार समितीला देण्यात आले आहेत. समितीने आपला स्वयंस्पष्ट शिफारस अहवाल शासनाला तीन महिन्यांच्या मुदतीत सादर करायचा आहे.

१२ वर्षे प्रलंबित प्रश्नाला न्याय-या निर्णयाबाबत बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, कोळीबांधव हे मुंबईचे मूळ रहिवासी असून त्यांच्या हक्कांचे रक्षण करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे.

# दुष्काळाच्या संकटात नागरिकांच्या पाठीशी शासन : प्रशासनाची भक्कम साथ

■ अहिल्यानगर जिल्ह्यात ३ लाख ३१ हजार नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा

■ १६१ गावांतील ९६१ वाड्या-वस्त्यांना १६९ टँकरद्वारे पाणीपुरवठा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

दुष्काळी परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी राज्य शासन आणि जिल्हा प्रशासन नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी विविध उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्यात येत आहेत. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. ८ ऑक्टोबरपर्यंतच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील १६१ गावांमधील ९६१ वाड्या-वस्त्यांना १६९ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून, ३ लाख ३१ हजार २३३ नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा दिलासा मिळत आहे. दुष्काळाच्या आव्हानात्मक परिस्थितीत नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देत शासन आणि प्रशासनाने मदतीचा हात पुढे केला आहे.

पाणीटंचाईच्या काळात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, तसेच ग्रामीण भागातील कुटुंबांना आवश्यक पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी प्रशासनाकडून टंचाईग्रस्त गावांमधील परिस्थितीचा आढावा घेऊन पाणीपुरवठ्याचे नियोजन केले जात आहे. उपलब्ध यंत्रणा आणि संसाधनांचा प्रभावी वापर करून गरजेनुसार टँकरद्वारे पाणी पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे. दुष्काळाच्या झळा कमी करण्यासाठी शासनाने पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

पाथर्डी, कर्जत आणि शेवगाव तालुक्यांत व्यापक उपाययोजना*

आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडून प्राप्त अहवालानुसार, जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. यामध्ये पाथर्डी तालुक्यात सर्वाधिक ६२ गावांतील ३५१ वाड्या-वस्त्यांना ७४ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. कर्जत तालुक्यात २७ गावांतील १९९ वाड्या-वस्त्यांसाठी २२ टँकर, तर शेवगाव तालुक्यात २८ गावांतील १६८ वाड्या-वस्त्यांसाठी २० टँकर कार्यरत आहेत.

नगर तालुक्यात १९ गावांतील ९१ वाड्या-वस्त्यांना १९ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. पारनेर तालुक्यात ४ गावांतील ३१ वाड्या-वस्त्यांसाठी ५ टँकर, संगमनेर तालुक्यात ८ गावांतील १६ वाड्या-वस्त्यांसाठी ७ टँकर, नेवासा तालुक्यात २ गावांतील १८ वाड्या-वस्त्यांसाठी २ टँकर आणि जामखेड तालुक्यात ६ गावांतील ७ वाड्या-वस्त्यांसाठी ८ टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. श्रीगोंदा तालुक्यात ४ गावांतील ४९ वाड्या-वस्त्यांना ४ टँकरद्वारे, तर नगर परिषद पारनेर क्षेत्रात १ गावातील ३१ वाड्या-वस्त्यांना ८ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. या उपाययोजनांमुळे जिल्ह्यातील विविध भागांतील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत.

१६९ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठ्याचे नियोजन*

जिल्ह्यात पाणीटंचाई निवारणासाठी एकूण १६९ टँकरची व्यवस्था करण्यात आली असून, त्यामध्ये ४ शासकीय आणि १६५ खासगी टँकरचा समावेश आहे. उपलब्ध टँकर यंत्रणेच्या माध्यमातून टंचाईग्रस्त गावांतील वाड्या-वस्त्यांपर्यंत पाणी पोहोचविण्याचे काम सुरू आहे. परिस्थितीनुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे, उपलब्ध पाणीस्रोतांचा वापर करणे आणि नागरिकांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करून देणे यावर प्रशासनाचा भर आहे.

दुष्काळाच्या संकटात नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासन कटिबद्ध



राज्यातील टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने २६५ तालुके दुष्काळी जाहीर केले असून, त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात पाणीटंचाई निवारणासह विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. दुष्काळाचा सामना करणाऱ्या नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या अडचणी कमी करणे हे प्रशासनाचे प्राधान्य आहे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत, दुष्काळाच्या कठीण काळातही नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची भूमिका शासन आणि प्रशासनाने घेतली आहे.

## पाण्याचा योग्य वापर करून दुष्काळावर मात करा! : आमदार बाबुराव कदम कोहळीकर

नाव्हा येथे वर्गखोलीच्या लोकार्पण सोहळ्यात विद्यार्थी व शेतकऱ्यांना पाणी बचतीचा संदेश

तामसा (समर्थ गांवकरी)

हदगाव तालुक्यातील नाव्हा येथे एका वर्गखोलीच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हदगाव तालुक्याचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी विद्यार्थी व शेतकऱ्यांना दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करण्यासाठी पाण्याचा काटकसरीने व योग्य पद्धतीने वापर करण्याचे आवाहन केले.

सध्या दुष्काळजन्य परिस्थितीचे आव्हान लक्षात घेता उपलब्ध पाण्याचे नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून पाण्याचा अपव्यय टाळून त्याचा योग्य वापर केला



पाहिजे. शेतकऱ्यांनी पिकांना पाणी देताना योग्य नियोजन करावे, पाणी बचतीच्या उपाययोजना राबवाव्यात आणि भविष्यात उद्भवणाऱ्या पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करण्यासाठी आतापासूनच प्रयत्न करावेत, असा संदेश आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी यावेळी दिला.विद्यार्थ्यांनीही पाण्याचे महत्त्व ओळखून आपल्या कुटुंबात आणि समाजात पाणी बचतीबाबत जनजागृती करावी.

पाण्याचा जपून वापर करणे ही केवळ शासनाची किंवा शेतकऱ्यांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, असेही त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून अधोरेखित केले.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या भुमीवर जेव्हा गद्दरांचा (?) झेंडा फडकतो तेव्हा : खासदार संजय राऊत

शिवनेरी (समर्थ गांवकरी)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या भुमीवर जेव्हा गद्दारांचा (?) झेंडा फडकतो तेव्हा ...... छत्रपतींचा आत्मा तळमळत असतो . असे विधान किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी पंचलिंग चौक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केल्यानंतर शिवसेनेची मुलुख मैदानी तोफ खासदार संजय राऊत यांनी गद्दारांचा समाचार या प्रसंगी सांगितला .

जुन्नर तालुक्यातील व शहरातील सर्व शिवसैनिक महिला भगिनी ओवाळणी व स्वागत सर्व पदाधिकारी व मान्यवरांचे केले .

यावेळी शिवसेना नेते बबन थोरात , संपर्कप्रमुख किरण तावडे , नगरसेविका दीपमाला बढे , सह संपर्कप्रमुख दिलीप बाम्हणे , जिल्हाप्रमुख सुरेश भोर , तालुका अध्यक्ष भास्कर गाडगे , जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे , उपसभापती अमित ढोले उपस्थित होते.

खासदार संजय राऊत पुढे म्हणाले , शिवनेरीचा शिलेदार .... ?आपला माणूस.....? हे सगळं खोटं



आहे . गद्दरांना प्रतिष्ठा देऊ नका , शिवरायांचा संदेश आहे. येणाऱ्या विधानसभा काळात जुन्नरकर आपली चूक दुरुस्त करतील. पुढील विधानसभा शिवसेनेकडून लढवावी लागेल . यावेळी शिवसेना शिरूर मतदार संघाचे नेतृत्व करेल .

यावेळी शिवसैनिकांनी हिंदुरुदय सम्राट सरसेनापती बाळासाहेब ठाकरे , शिवसेना पक्षप्रमुख उध्दव बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या. पवित्र पावनभुमीत सर्व शिवसैनिक येथे आले की , छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेले भूमीची माती कपाळाला लागते . या जुन्नरकरनी दोन विभूती वर प्रेम केल , एक छत्रपती शिवाजी महाराज व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे होय.

## तामसा शहरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळेच्या समोर अपघात रोखण्यासाठी १९ ऑक्टोबरला उपोषणाचा इशारा!

गतिरोधक, डिव्हायडर, झेब्रा क्रॉसिंगसह सुरक्षाव्यवस्थेची मागणी; ममता जोशी यांचे प्रशासनाला निवेदन

तामसा (समर्थ गांवकरी)

तामसा-हदगाव राज्य महामार्ग क्रमांक २५१ तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ (आय) वरील तामसा शहर परिसरात वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी गतिरोधक, डिव्हायडर, झेब्रा क्रॉसिंग, वाहतूक सूचना फलक आणि पब्लिक सर्व्हिस रोडसह आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या हदगाव तालुकाध्यक्षा ममता अर्जुन जोशी यांनी केली आहे. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नांदेड यांना निवेदन देऊन १९ ऑक्टोबर २०२६ रोजी तामसा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

तामसा शहरातून जाणाऱ्या महामार्गावर दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ वाढत आहे. हा रस्ता शहराच्या मध्यवस्तीतून जात असल्याने शालेय विद्यार्थी, महिला, वृद्ध नागरिक, पादचारी आणि वाहनधारकांना दररोज जीव धोक्यात घालून मार्गक्रमण करावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी १६ एप्रिल २०२६ रोजी संबंधित विभागाला निवेदन देण्यात आले होते. त्यावेळी गतिरोधक, डिव्हायडर, पब्लिक सर्व्हिस रोड, वाहतूक सूचना फलक आणि झेब्रा क्रॉसिंग उभारण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्याप या मागण्यांवर ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

तामसा शहरातील शाळा, चौक, बाजारपेठ आणि इतर वर्दळीच्या ठिकाणी वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा अभाव असल्याने अपघाताचा धोका कायम आहे. रस्ता ओलांडताना विद्यार्थ्यांसह नागरिकांना मोठी कसरत करावी लागत असून, प्रशासनाने अपघात घडल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी अपघात होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

तामसा शहर परिसरात आवश्यक ठिकाणी गतिरोधक उभारणे, डिव्हायडरची व्यवस्था करणे, शाळा व बाजारपेठ परिसरात झेब्रा क्रॉसिंग आखणे, वेगमर्यादा व वाहतूक सूचना फलक लावणे, पब्लिक सर्व्हिस रोड उपलब्ध करून देणे तसेच अपघातप्रवण ठिकाणांची पाहणी करून कायमस्वरूपी सुरक्षा उपाययोजना करणे, या प्रमुख मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

यापूर्वी निवेदन देऊनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी असल्याचे ममता जोशी यांनी म्हटले आहे. संबंधित विभागाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी; अन्यथा १९ ऑक्टोबर रोजी लोकशाही मार्गाने उपोषण करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री, जिल्हाधिकारी नांदेड, तहसीलदार हदगाव, गटविकास अधिकारी पंचायत समिती हदगाव, तामसा पोलीस प्रशासन तसेच हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार यांना देण्यात आल्या आहेत.

आता संबंधित विभाग या मागण्यांवर कितपत गांभीर्याने कार्यवाही करतो आणि तामसा शहरातील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न मार्गी लागतो का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# बालमटाकळीची श्री बालंबिका देवी एक जागृत देवस्थान

अहमदनगर (समर्थ गांवकरी)

अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यात मराठवाड्याच्या सरहद्दीला लागून असलेले बालम टाकळी हे गाव. या गावाला पूर्वी बोधेगाव टाकळी असे संबोधले जाई. पाच पिढ्या पूर्वी व नंतर च्या दोन पिढ्या बाळूबाई टाकळी आणि आता बालमटाकळी हे नाव प्रचलित आहे.

पाच पिढ्यापुर्वी या बाळूबाई ची कहाणी अशी आहे की, हे गाव अगदी छोटेसे होते पण निजमाच्या सरहद्दीवर असल्याने महत्वपूर्ण झाले. गावात देशमुख मराठा पाटीलयांचे प्राबल्य होते. गावाची पाटील कि वंश परंपरागत त्यांचीच होती. गाव समृद्ध व उद्योगशील होते.बाराबलुते पद्धतीमुळे प्रत्येकजन आपल्या कार्यक्रमात व्यग्र असत. या देशमुख घराण्यात पाच पुढेपुर्वी पाटलाला एक मुलगी होती बाली हे नाव तिला लाडाने सर्व जन बाळूबाई म्हणत तिला बोलता समजत येऊ लागताच पाचव्या वर्षापासून तिच्या कृतीचे लोकांना आश्चर्य वाटू लागले. आपल्या गावात देवीचे मंदिर असावे असे तिला वाटू लागले. आणि तिने मंदिर उभारण्यासाठी आई-वडलाकडे हट्ट धरला. पण तो दुर्लक्षित केला. यापुढे हि कुमारिका आठव्या वर्षी अंनतात विलीन झाली.

गावाला मोठी चिरेबंदी वेश आहे तिच्या बाहेर एक ओढा होता, व त्याच्या बाजूने काटेरी निवडुंगाचे बन होते व नाल्याच्या पूर्वेस देशमुख घराण्याची स्मशानभूमी आहे. याच भूमीवर बालीवर अंत्यसंस्कार करण्यात आले. पण या मुलीच्या भवतीच्या प्रभावाने लोकांना ती जिवंत असल्याचा भास होत असे. कोणाला तिचा झुडपातून आवाज ऐकू यायचा. कोणाला दिसली परुंतु अदृश झाली अश्याप्रकारचा भास होत असे. कालांतराने देशमुखांची स्मशानभूमी असलेली जमिनीपैकी काही जागा तत्कालीन एका माळ्याने शेतीसाठी उपयोगात आणली व त्याने त्या शेतीमध्ये विहीर खोदण्यासाठी भल्या पहाटेच सुरवात केली. बरेच खोदकाम झाल्यावर काळा पाषाण लागला असे वाटून पहारी बोठून गेल्या पण पाषाण काही केल्या हटेना त्या माळ्याने एकदम बोल भवानी कि जय असे बोलून सर्व शक्ती एकवटून प्रहार केला तर पहार चार बोटे त्या पाषाणात खोल गेली. त्याच क्षणी त्या पाषाणातून कारंज्यासारख्या चिळकांड्या उडाल्या. माळी भयभीत होऊन मुर्चीत पडला व खोदकाम थांबवण्यात आले त्याच दिवशी रात्री देशमुख घराण्यातील पाटलांच्या स्वप्नात कुमारिका बोलू लागली. तिने दृष्टांत दिला कि, माझी रेणुका माता विहिरीत आहे. आणि तिच्या शिरावर पहार लागली आहे. मी जिवंत असताना तुम्ही मंदिर बांधले नाही पण आता मंदिर बांधून देवीची स्थापना करा व बालंबिका असे संबोधा प्रती वर्षी नवरात्र उस्तव साजरा करा.आणि शाकंभरी पौर्णिमेस यात्रा भरवत जा. ती तुम्हाला कुठलीही कमतरता भासू देणार नाही. हा दृष्टांत तिने माळ्यालाही दिला. दुसऱ्या दिवशी दोघांना पडलेले स्वप्ने एकमेकांना सांगितले पुढे लगेच देशमुख पाटलांनी त्या विहिरीलीत मूर्तीचा तांदळा कुशल कारागिराकडून अलगद काढून घेतला. हा तांदळा अर्ध मूर्ती असून चार फुट उंच व तीन फुट रुंद असा आहे. गावकऱ्यांच्या मदतीने मंदिराचे काम हाती घेण्यात आले. काळ्या पाषाणात हेमाडपंथी मंदिर उभारण्यात आले. त्यात देवीची प्राणप्रतिष्ठा विधिवत सोहळ्यात स्थापन केली गेली.

देवीच्या तांदळा समवेत उजव्या बाजूने परशुराम व डाव्या बाजूस गणपती स्थापन करण्यात आले. देवीच्या मंदिरासमोर दगडी पाषाणाची दीपमाळ असून तीही पौर्णिमेस पाजळली जाते.पुढे पाटील व गावकरी देवीस बाळूबाई देवी म्हणू लागले व गावास बाळूबाई टाकळी म्हणून सिद्ध झाले.

देशमुख पिढीतील पाटलांनी देवीची भक्तिपूर्वक व श्रद्धेने आजतक सेवा चालू ठेवली .येत्या पाच पिढ्यांपासून नवरात्रोत्सव, यात्रा चालू आहे. नवरात्र घटस्थापनेपासून दसऱ्यापर्यंत प्रत्येक दिवशी विधिवत पूजन,सप्तशती पाठ, नवचंडी हवन,रोज सवाद्य आरती व नंतर तांबुल विडा प्रसाद असा कार्यक्रम असतो. नवमीच्या दिवशी आचार्य ब्राम्हण यांना मंदिरातच स्वयंपाक करून भोजन दिले जाते व या प्रसादाने उपवासाची सांगता केली जाते. या देवीचे जाज्वल्य एवढे आहे की, आजही नवरात्रात आरतीच्या वेळी दवबिंदू तृणावर उडावेत असे बिंदू मूर्तीच्या तांदळ्यावर जमा होतात, तसेच नवसालाही पावते. दूरवरून भाविक या बाळूबाईच्या दर्शनासाठी रीघ लावतात. ज्याच्या मनोकामना पूर्ण होतात ती व्यक्ती देवी मंदिरात संपूर्ण नवरात्रात उपवास करून मंदिरात



बसतात. त्यासोबतच काठीवाले सुध्दा उपवास करून उभे राहतात. झोपळ्यावरच झोपतात. दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढतच आहे.

प्रत्येक पौष पौर्णिमेस यात्रा भरवली जाते. पौर्णिमेच्या आदल्या दिवशी देवास अभिषेक महापूजा करून भाजी-भाकरी व तेलातील पदार्थाचा नैवेद्य दाखविला जातो. रात्री बारा गाड्या ओढण्याचा जोरदार कार्यक्रम होतो. श्री बालंबिका देवी हि सर्व जाती धर्माच्या लोकांच्या श्रद्धेचे स्थान आहे. श्री बालंबिका देवी हि गावची ग्रामदैवत झालेली. आहे. देवीच्या वास्तव्याने गावाचा विकास तर झालाच पण पंचक्रोशीत गावाची ख्याती सर्वदूर पसरली.

**संकलन- प्रशांत बाफना, ८०५५४४०३८५**

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## कुस्तीच्या आखाड्यात ईश्वरी घेण्याची सुवर्णमहोत पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

जिद्द  मेहनत आणि कौशल्याच्या जोरावर कुस्तीच्या आखाड्यात आपले वर्चस्व सिद्ध करत पारनेरच्या ईश्वरी सखाराम घेमूड हिने जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. तिच्या या शानदार विजयामुळे पुणे विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी तिची निवड झाली असून, ईश्वरीच्या यशाने पारनेरच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाची भर घातली आहे. नेवासा फाटा येथील घाडगे पाटील शैक्षणिक संकुलात २ ऑक्टोबर रोजी झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत ईश्वरीने आपल्या खेळाचा ठसा उमटवला. १७ वर्षांखालील वयोगटातील ४६ किलो वजन गटात सहभागी होत तिने प्रतिस्पर्धी मल्लांना कडवी टक्कर दिली. प्रत्येक फेरीत चपळाई, ताकद आणि कुस्तीतील डावपेचांचा प्रभावी वापर करत तिने अंतिम फेरीत प्रवेश केला. अखेर आपल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर सुवर्णपदक पटकावत तिने यशाची मोहोर उमटवली. ईश्वरी ही पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स एड सायन्स महाविद्यालयात इयत्ता अकरावीच्या कला शाखेत शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबतच कुस्तीच्या मैदानातही तिने मिळवलेले हे यश तिच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे प्रतीक ठरले आहे.



## वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ साधक ह.भ.प. शिवनाथ वाकचौरे यांचे निधन

**कोतूळ (समर्थ गांवकरी)**



पंचक्रोशीतील वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ साधक, उत्कृष्ट गायक-वादक आणि कुशल कारागीर ह.भ.प. शिवनाथ रामचंद्र वाकचौरे मिस्त्री यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने वारकरी संगीत परंपरेतील एक अभ्यासू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले असून परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. ह.भ.प. शिवनाथ वाकचौरे यांनी आयुष्यभर वारकरी संप्रदायाची परंपरा जपत भक्तिमार्गाची सेवा केली. काकडा, हरिपाठ, नित्यनेमाचे भजन तसेच संगीत भजन यांमध्ये त्यांना विशेष रुची होती. आपल्या सुरेल आवाजाने आणि संगीताच्या जाणिवेने त्यांनी परिसरात गायक म्हणून वेगळी ओळख निर्माण केली होती. पंचक्रोशीतील विविध गावांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या हरिनाम सप्ताहांना ते आवर्जून उपस्थित राहत असत. या सप्ताहांमध्ये गायन-वादनाच्या माध्यमातून ते आपली भक्तिसेवा अर्पण करत. त्यांच्या गायनातून भक्तिरसाची अनुभूती मिळत असे. वारकरी संगीत परंपरेचा अभ्यास आणि भजनाप्रती असलेली निष्ठा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांत त्यांनी सातत्याने योगदान दिले. भक्तिसेवेबरोबरच शिवनाथ वाकचौरे हे एक उत्तम कारागीर म्हणूनही परिचित होते. मिस्त्रीकामातील कौशल्य, मेहनती वृत्ती आणि कामाप्रती असलेली निष्ठा यामुळे त्यांचा परिसरात लौकिक होता. धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रांत त्यांनी आपल्या कार्यातून वेगळी छाप उमटवली. त्यांच्या पश्चात पत्नी, कालिदास, भानुदास, अनिल व कोतूळ ग्रामपंचायतीचे माजी सदस्य प्रकाश वाकचौरे ही चार मुले तसेच सुना नातवंडे असा परिवार आहे.

## महाराजा कॉलेजचे शालेय विभागीय तायक्वांदो स्पर्धेमध्ये यश




**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत न्यू इंग्लिश स्कूल लांडेवाडी, पुणे येथे ४ व ५ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या शालेय विभागीय तायक्वांदो स्पर्धेमध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय श्रीगोंदा खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी करत यश संपादन केले ते खालील प्रमाणे

पुणे विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धा २०२६-२

१.प्रज्वल ढवळे - रौप्य पदक

२.ऋतुराज थिटे - रौप्य पदक

३प्राजक्ता तरटे - कांस्य पदक

या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन मा. आ. बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. बाबासाहेब भोस, मा. आ. राहुल जगताप, सदस्य महावीर पटवा, क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, वरिष्ठ उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, ज्युनिअर उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, विभागप्रमुख प्रा उषा बोरुडे, प्रा विजय मगर, प्रा संदीप दरेकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. खेळाडूंना क्रीडा शिक्षक संजय डफळ आणि क्रीडा संचालिका कल्पना बागुल प्रशिक्षक जयेश आनंदकर सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# मुलीची ओढणी ओढून कंबरेजवळ हात लावला ; न्यायालयाने ठोठावली थेट ही शिक्षा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अल्पवयीन मुलींची रस्त्यात छेडछाड करून त्यांना शिवीगाळ तसेच मारहाण केल्याप्रकरणी विनायक अर्जुन गारुडकर (वय २२, रा. आंधळे चौरे हौसिंग सोसायटी, बोल्हेगाव) याला न्यायालयाने दोषी ठरविले.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. कचरे यांनी आरोपीला एक वर्ष सक्तमजुरी आणि पाच हजार रुपये दंड, एक महिना कारावास व एक हजार रुपये दंड, तसेच पॉक्सो कायद्याच्या अंतर्गत एक वर्ष कारावास व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. या प्रकरणात विशेष सरकारी वकील अ‍ॅड. मनिषा पी. केळगंद्रे-शिंदे यांनी सरकार पक्षातर्फे काम पाहिले.

प्रकरणातील माहितीनुसार, लहान मुलांसाठी काम करणाऱ्या संस्थेत राहून नववीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या काही अल्पवयीन मुली ८ मार्च २०१४ रोजी शाळेतून रस्त्याने जात होत्या. त्यावेळी विनायक गारुडकर, विकी उर्फ सनी विष्णू शिंदे आणि सावन उर्फ योगेश छगन काळे हे दुचाकीवरून तेथे आले. आरोपींनी मुलींच्या जवळून दुचाकी नेत त्यांना कट मारला आणि अश्लील शेरेबाजी केली. मुलींनी विरोध केल्यानंतर आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली. याचवेळी एका मुलीची ओढणी ओढण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या घटनेची माहिती शिक्षकांना देण्यासाठी एक मुलगी जात असताना आरोपी तिच्या मागे धावत गेला. त्याने तिची ओढणी ओढून तिच्या कंबरेजवळ हात लावला आणि धमकीवजा वक्तव्य केले. त्याचवेळी संस्थेतील एक शिक्षक तेथे आले. त्यांनी आरोपींना समजावण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही शिवीगाळ आणि मारहाण करण्यात आली.

आरोपींनी फोन करून आणखी १५ ते २० जणांना तेथे बोलावून घेतल्याचे तपासात समोर आले. या जमावाने शिक्षकाला लाथाबुक्क्यांनी आणि दांडक्याने मारहाण केल्याचा आरोप आहे. त्यातील एका व्यक्तीने चाकूने शिक्षकाच्या कमरेजवळ वार करून त्यांना जखमी केले. दरम्यान, एका अल्पवयीन मुलीच्या पोटात लाथ मारण्यात आली, तर दुसऱ्या मुलीच्या छातीत बुक्की मारण्यात आल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.




या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात विकी उर्फ सनी विष्णू शिंदे, सावन उर्फ योगेश छगन काळे आणि विनायक अर्जुन गारुडकर यांच्यासह १५ ते २० अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान विनायक गारुडकर मिळून न आल्याने त्याला फरार घोषित करण्यात आले होते. त्यानंतर इतर दोन आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आणि त्यांना न्यायालयाने शिक्षा सुनावली होती. दरम्यान, गारुडकर पोलिसांच्या हाती लागल्यानंतर त्याच्याविरुद्ध पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

दरम्यान, या प्रकरणात विशेष सरकारी वकील अ‍ॅड. मनिषा पी. केळगंद्रे-शिंदे यांनी सरकार पक्षातर्फे काम पाहिले. तर एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक महेश जोशी आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल स्वाती गुंजाळ यांनी तपास केला.

## पारनेर तालुक्यातील पळशी येथील गायरान जमिनीवरील अतिक्रमण व बेकायदेशीर विहिरींबाबत ग्रामस्थांची  तक्रार

**पारनेर (समर्थ गांवकरी)**





पारनेर तालुक्यातील मौजे पळशी गावातील शेतकरी व मेंढपाळांनी गायरान जमिनीवरील बेकायदेशीर अतिक्रमण आणि अनाधिकृत विहिरींबाबत गंभीर तक्रार केली आहे. गावातील गट क्रमांक ५९१ (२०.७६ हेक्टर) आणि ५९२ (२१.८३ हेक्टर) हे क्षेत्र राखीव गायरान म्हणून घोषित आहे. दुष्काळामुळे जनावरांसाठी चारा आणि पाण्याचा प्रश्न आधीच गंभीर झाला असताना काही लोकांनी शासनाची परवानगी न घेता या जमिनीवर अतिक्रमण करून शेती सुरू केली आहे. त्याचबरोबर बेकायदेशीर विहिरीही खोदल्या आहेत.

या अतिक्रमणामुळे गायरान क्षेत्र नष्ट होत असून जनावरांना चरण्यासाठी जागा शिल्लक राहिलेली नाही. गायरानमधून जाणारा सार्वजनिक रस्ता आणि पायवाट अडवला गेला आहे.

नैसर्गिक नाला बुजविल्याने पावसाळ्यात पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नाही. परिणामी परिसरातील शेतजमिनी आणि वस्त्यांमध्ये पाणी साचून मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ग्रामस्थांच्या सार्वजनिक सोयीसुविधांनाही अडथळा निर्माण झाला आहे.गावातील समस्त ग्रामस्थ आणि मेंढपाळांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे अर्ज करून विनंती केली आहे की, सदर गट क्रमांकाची प्रत्यक्ष मोजणी करून अतिक्रमण आणि बेकायदेशीर विहिरी तात्काळ काढून टाकाव्यात. गायरान क्षेत्र जनावरांना चरण्यासाठी सर्वांसाठी खुले करावे आणि अतिक्रमण करणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

> **पळशी येथीलग्रामस्थांच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठवत असून गायरान जमिनीवरील अतिक्रमणासारख्या मुद्द्यांवर प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून कारवाईची मागणी केलेली आहे तरी प्रशासनाने याकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे पुढील काळात प्रशासनाने जर लक्ष दिले नाही तर या ठिकाणी मोठा वाद निर्माण होऊ शकतो**
>
> **- अरुण रोडे**

अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे आणि पळशी गावातील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी साहेब यांना निवेदनाद्वारे ही मागणी केली आहे. त्यांनी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून गायरान जमिनीचे संरक्षण करावे, असे आवाहन केले आहे. गावातील शेतकरी आणि मेंढपाळ या अतिक्रमणामुळे आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या अडचणीत सापडले आहेत. जनावरांच्या चारापाण्याचा प्रश्न गंभीर होत असल्याने स्थानिकांमध्ये नाराजीची लाट पसरली आहे.

प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन अतिक्रमण काढून टाकण्याची आणि गायरान क्षेत्र मुक्त करण्याची आवश्यकता असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. अन्यथा भविष्यात अधिक मोठ्या समस्या निर्माण होऊ शकतात, असा इशाराही देण्यात आला आहे.

## भाद्रपदी अमावस्येला वडझिरेत शनिदर्शना साठी भाविकांची मांदियाळी..!

### शनी चौथऱ्यावर दिवसभर भक्तांची गर्दी विद्युत रोषणाईने मंदिर परिसर उजळला

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**




पारनेर तालुक्यातील वडझिरे येथे भाद्रपदी अमावस्येनिमित्त शनिदर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. शनिवार, दि. १० ऑक्टोबर रोजी बैलपोळ्याचा सण आणि भाद्रपदी अमावस्या असा दुहेरी योग जुळून आल्याने वडझिरेसह परिसरातील गावांमधून भाविकांनी शनी चौथऱ्यावर दर्शनासाठी मोठी उपस्थिती लावली.

वडझिरे येथे उभारण्यात आलेल्या शनी चौथऱ्यावर पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांची रीघ लागली होती. सकाळी ७ वाजल्यापासून अभिषेक, महापूजा आणि होम हवन अशा धार्मिक विधींना सुरुवात झाली. हे विधी सुनील देवराम दिघे यांच्या हस्ते पार पडले. धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले.सकाळपासून सायंकाळपर्यंत भक्तांची वर्दळ

शनिदर्शनासाठी सकाळी ६ वाजल्यापासून ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत भाविकांची ये-जा सुरू होती. शनी चौथऱ्यासमोर भव्य मंडप उभारण्यात आला होता.

तसेच मंदिर परिसरात करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईमुळे संपूर्ण परिसर उजळून निघाला होता. भक्तांची गर्दी, धार्मिक वातावरण आणि शनिदेवाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांचा उत्साह यामुळे वडझिरे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

या धार्मिक सोहळ्याच्या निमित्ताने श्री शनेश्वर जीर्णोद्धार सेवा समिती, वडझिरे यांच्या वतीने दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे मनोभावे स्वागत करण्यात आले.

भाद्रपदी अमावस्या आणि बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर वडझिरे येथील शनी चौथऱ्यावर दिवसभर सुरू असलेल्या भाविकांच्या गर्दीने परिसरातील धार्मिक श्रद्धेचे दर्शन घडवले.

## साईबाबांच्या प्रसादासाठी पर्यावरणपूरक ज्यूट पिशव्या; राष्ट्रीय ज्यूट बोर्डाकडून शिर्डी संस्थानला ५ हजार पिशव्या!

**शिर्डी, (समर्थ गांवकरी)**






श्री साईबाबांच्या प्रसाद वितरणासाठी पर्यावरणपूरक ज्यूट पिशव्यांचा वापर करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय ज्यूट बोर्ड, वस्त्र मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून श्री साईबाबा संस्थानला ५ हजार ज्यूट पिशव्या विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यापैकी १ हजार पिशव्या गुरुवारी (दि. ८ ऑक्टोबर) संस्थानकडे सुपूर्द करण्यात आल्या. राष्ट्रीय ज्यूट बोर्डाचे सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी शशी भूषण सिंह आणि संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर यांच्या उपस्थितीत पाच साईभक्तांना पिशव्यांचे वितरण करून उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

ज्यूट हा नैसर्गिक, नूतनीकरणक्षम आणि जैवविघटनशील तंतू असल्याने प्लास्टिकसह एकदाच वापरल्या जाणाऱ्या पॅकेजिंग साहित्याला तो पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकतो. प्रसाद वितरणासाठी या पिशव्यांचा वापर केल्यामुळे पर्यावरण संवर्धनाला हातभार लागणार असून, भाविकांमध्येही पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश पोहोचणार आहे. प्रसाद घेऊन गेल्यानंतर भाविकांना या पिशव्यांचा घरगुती कामांसाठी पुनर्वापरही करता येणार आहे. या उपक्रमाबाबत १० जुलै २०२६ रोजी राष्ट्रीय ज्यूट बोर्ड आणि साईबाबा संस्थान यांच्यात बैठक झाली होती. त्यानंतर बोर्डाने ५ हजार पिशव्या विनामूल्य उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली. यावेळी बोर्डाच्या मार्केट प्रमोशन विभागाचे संयुक्त संचालक किशन सिंह घुघत्याल आणि संस्थानचे प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले उपस्थित होते. उर्वरित पिशव्या पुढील टप्प्यात उपलब्ध करून दिल्या जाणार असून, या उपक्रमातून पर्यावरणपूरक पॅकेजिंगचा वापर व पुनर्वापराबाबत जनजागृती करण्यास मदत होणार आहे.

## बनावट कारवाया करणाऱ्या पोलिस अधिकारी : कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करा अन्यथा उपोषाणास बसणार

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

संगमनेर एमडी ड्रग्स बनावट प्रकरण व अहिल्यानगर कोतवाली पोलिस स्टेशन येथील गांजा बनावट कारवाई प्रकरणी दोषी असलेल्या पोलिस कर्मचारी आणि अधिकारी यांची बदली न करता त्यांना तात्काळ सेवेतून निलंबित करावे. ही कार्यवाही एक महिन्यात न झाल्यास विशेष पोलिस महानिरीक्षक नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा अन्याय निवारण निर्मुलन समितीचे अध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.

यासंदर्भात विशेष पोलिस महानिरीक्षक नाशिक यांना दिलेल्या निवेदनात श्री. रोडे यांनी म्हटले आहे की दोन आठवड्यांपूर्वी संगमनेर बसस्थानक येथे एका वाहनात पोलिसांच्या उपस्थितीत एका तिरहाईत इसमाकरवी एमडी ड्रगचा पाऊच ठेवण्यात आला. अगोदर त्याच वाहनाची झडती घेतली असता काहीच आढळले नाही. नंतर उउढ्त नसलेल्या ठिकाणी नेऊन ड्रग ठेवून पंचनामा करण्यात आला व नाहक एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला. अशाच प्रकारे नगर शहरात एकाच्या घरात गांजाची पिशवी खाकी वर्दीच्या पाठिंब्यानेच ठेवण्यात आली व बनावट गुन्हा दाखल करण्यात आला.सदर दोन्ही प्रकरणांमध्ये संबंधित पोलिस उपनिरीक्षक व त्यांची साथ देणारे कर्मचारी यांच्यावर केवळ बदलीची किरकोळ शिक्षा करण्यात आली आहे, जी अत्यंत अपुरी आहे. सदर प्रकार हा NDPS ct चा गैरवापर करून सर्वसामान्य नागरिकांना खोटया गुन्हयात अडकवण्याचा व खाकी वर्दीतील दलालामार्फत पैसे उकळण्याचा प्रकार आहे.

# पिंटो ग्रंथालयाच्या वतीने नवरात्रोत्सवात 'वाचनशक्तीचा जागर' उत्कृष्ट पुस्तक अभिप्रायासाठी मिळणार मानाची पैठणी!

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून पिंटो ग्रंथालय, पाडळी आळे (ता. पारनेर) यांच्या वतीने वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी एक अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. 'वाचन शक्तीचा जागर' या संकल्पनेवर आधारित 'पुस्तकावर वाचक अभिप्राय स्पर्धा' घेण्यात येणार असून, उत्कृष्ट अभिप्राय देणाऱ्या महिला भगिनींना मानाच्या पैठणीने गौरविण्यात येणार आहे.

९ दिवसांत ९ वाडीवस्त्यांवरील महिलांचा सहभाग

हा नवरात्रोत्सव विशेष उपक्रम दिनांक ११/१०/२०२६ ते १९/१०/२०२६ या कालावधीत दररोज सकाळी ९ ते १० या वेळेत पिंटो ग्रंथालय, पाडळी आळे येथे पार पडेल. या ९ दिवसांत ९ वेगवेगळ्या वाडीवस्त्यांवरील महिलांना या उपक्रमात सहभागासाठी खास निमंत्रित करण्यात आले आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांत शक्तीची उपासना करताना, या निमित्ताने 'ज्ञानशक्तीचा' आणि 'वाचनशक्तीचा' जागर केला जाणार आहे. ही स्पर्धा सर्व महिला वाचकप्रेमींसाठी खुली आहे.

पुस्तकाची निवड: महिलांनी वाचलेल्या कोणत्याही मराठी पुस्तकावर कथा, कादंबरी, आत्मचरित्र, वैचारिक, इतिहास इत्यादी आपला अभिप्राय लिहायचा आहे. या स्पर्धेतील विजेत्यांसाठी विविध आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली असून,

२ मानाच्या पैठणी साड्या (आदिशक्ती नवरात्रीचा मान व क्रांतीज्योत सावित्रीचा वाण म्हणून गौरव).

नऊ मानाच्या साड्या: नऊ दिवसांसाठी ९ मानाच्या साड्या देण्यात येणार आहेत. सौजन्य: सौ. कविता विकास डेरे (सरपंच, पाडळी आळे).

सौ. साधना अशोक डेरे (CRP) आणि सौ. उज्वला सुखदेव डेरे.

सिल्वर महालक्ष्मी मूर्ती: साईराज कलेक्शन आळकुटी व सौ. रश्मी सचिनशेठ साखला यांच्या वतीने ९ महालक्ष्मी सील्वर मूर्ती दिल्या जातील.

सन्मानचिन्ह: १ ते ५ क्रमांक मिळवणाऱ्या विजेत्या महिला भगिनींना कै. दत्तात्रेय गावडे यांच्या स्मरणार्थ सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

स्पर्धेदरम्यान महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचेही आयोजन करण्यात आले असून, याचे सौजन्य सौ. रजनी उत्तम थोरात यांनी केले आहे. या सर्व विजेत्या महिलांचा पारितोषिक वितरण सोहळा सोमवार, दिनांक १९/१०/२०२६ रोजी संपन्न होणार आहे.




या कार्यक्रमाचे संयोजन श्री संगमेश्वर महिला ग्राम संघ, विविध संस्थांमधील महिला पदाधिकारी, पिंटो ग्रंथालय कार्यवाहक समिती आणि पाडळी आळे येथील सर्व महिला भगिनींच्या वतीने करण्यात आले आहे. परिसरातील जास्तीत जास्त महिलांनी या ज्ञानरूपी उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अ‍ॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# संघाच्या स्वयंसेवकाचे राष्ट्र निर्माण यातील योगदान महत्त्वाचे : प्रा. रवींद्र भुसारी

## ‘संघ शक्ती कलौ युगे’ कार्यक्रमाला हजारो युवक-युवतींची उपस्थिती; खासदार नागेश पाटील आष्टीकर व डॉ. अजित गोपछडे यांचे मार्गदर्शन

**किनवट (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त दुर्गा फाऊंडेशन, किनवटच्या वतीने गुरुवार, दि. ०८ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेला ‘संघ शक्ती कलौ युगे’ हा विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक प्रा. रविंद्र भुसारी यांनी देशाच्या जडणघडणीमध्ये संघाच्या स्वयंसेवकांचे योगदान आणि महत्त्व विशद केले. नव्या युगातील जनरेशन झेड (ऋषप न) पिढीतील युवक-युवती, महिला वर्ग तसेच विविध क्षेत्रांतील नागरिकांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याची ओळख करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमाला हजारो युवक-युवतींसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाला हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे आणि ज्येष्ठ संघ प्रचारक प्रा. रविंद्र भुसारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विविध विषयांवर मार्गदर्शन करताना हिंदुत्व, संघाचे विचार, कार्यकर्त्यांचे महत्त्व आणि राष्ट्रनिर्माणातील योगदान याविषयी आपले विचार मांडले.

हिंदुत्व म्हणजे सद्भावनेने जीवन जगण्याचा प्रयत्न – खा. नागेश पाटील आष्टीकर

खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी आपल्या मार्गदर्शनात हिंदुत्वाच्या संकल्पनेवर भाष्य केले. हिंदुत्वाकडे केवळ एका विशिष्ट चौकटीतून न पाहता, सद्भावनेने जीवन जगण्यासाठी केले जाणारे प्रयत्न आणि जीवनमूल्यांच्या दृष्टीने त्याकडे पाहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी आपल्या वक्तव्यातून अधोरेखित केले. समाजातील परस्पर संबंध, सद्भावना आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचे महत्त्वही त्यांनी विशद केले.

संघाच्या कार्यपद्धतीत कार्यकर्त्यांचे स्थान महत्त्वाचे – डॉ. अजित गोपछडे

राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शिकवणीवर आणि संघाच्या कार्यपद्धतीत कार्यकर्त्यांचे असलेल्या महत्त्वावर प्रकाश टाकला. संघाच्या कार्य प्रत्येक स्वयंसेवकाची भूमिका महत्त्वाची असून, संघटनात्मक कार्यात कार्यकर्त्यांचे योगदान आणि समर्पण यांना विशेष स्थान असल्याचे त्यांनी सांगितले. संघाच्या विचारांची आणि शिकवणीची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने अशा कार्यक्रमांचे महत्त्वही त्यांच्या मार्गदर्शनातून अधोरेखित झाले

देशाच्या जडणघडणीत संघ स्वयंसेवकांचे योगदान मोलाचे – प्रा. रवींद्र भुसारी

कार्यक्रमातील प्रमुख वक्ते ज्येष्ठ संघ प्रचारक प्रा. रविंद्र भुसारी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य, त्याचे महत्त्व आणि देशाच्या जडणघडणीतील संघाच्या स्वयंसेवकांच्या योगदानाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. राष्ट्राच्या उभारणीत स्वयंसेवकांची भूमिका, संघटनात्मक कार्याचे महत्त्व आणि समाजजीवनात कार्यकर्त्यांनी बजावलेली भूमिका या विषयांवर त्यांनी आपले विचार मांडले. युवकांनी देश, समाज आणि राष्ट्रजीवनाशी संबंधित विषय समजून घेऊन सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, या दृष्टीने त्यांच्या मार्गदर्शनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमातून युवक-युवतींना संघाचे कार्य आणि विचार समजून घेण्याची संधी मिळाली. विशेषतः जनरेशन झेड पिढीतील तरुणांचा मोठा सहभाग हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. तर त्यांनी हा कार्यक्रम देशाचा असे उद्गार आयोजित कार्यक्रमाप्रती बोलतांना सांगितले तर महिला वर्गासह सर्वधर्मीय नागरिकांची उपस्थिती लक्षवेधी होती.

या कार्यक्रमाला उमरखेडचे आमदार किशनराव वानखेडे, हनुमंत साधक किशन महाराज भोयर, विश्व हिंदू परिषदेचे श्याम रायेवार, कमलाकर दिक्कतवार, विभाग संघचालक संतोष तिरमनवार, जिल्हा संघचालक डॉ. संदीप जन्नावार, माहूर संस्थानचे विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय कान्हव, वेदशाळेचे केदार गुरुजी, मानिकराव भोसले, गजानन तुप्तेवार, शिरीष मनाठकर, शंकरराव अमिलकंठवार, डॉ. नितीन उपासनी, सौ. संध्या राठोड, प्रफुल्ल राठोड, प्रा. किशन मिरासे, जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, माजी नगराध्यक्ष इसा खान, सुनिल पाटील, राघु मामा, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष मुसा खान, माजी शहराध्यक्ष फिरोज तंवर, सारखणी फार्मरचे समद फाजलानी, अनिल तिरमनवार, श्रीनिवास नेम्मानिवार, स्वागत आयनेनीवार, अनिल पाटील सूर्यवंशी, बालाजी मुरकुटे, सूरज सातुरवार, गजानन पाटील, सुनिल




आयनेनिवार, पत्रकार अरुण तम्मडवार, आशिष देशपांडे, कचरू जोशी, मुकुंद नेम्मानिवार, रोहित चाडावार, सुधाकर सोनारीकर, गजानन चहेल आणि प्रकाश भोयर यांच्यासह परिसरातील संघ प्रचारक, विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि सर्वधर्मीय नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दुर्गा फाऊंडेशनच्या उपाध्यक्षा दुर्गा भोयर यांनी केले. सूत्रसंचालन सुनील पाठक यांनी केले, तर आभार प्रदर्शन फाऊंडेशनचे अध्यक्ष अक्षय भोयर यांनी केले. यावेळी सुधाकर भोयर यांनीही विशेष मार्गदर्शन केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त किनवटमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला लाभलेला युवकांचा मोठा प्रतिसाद आणि मान्यवरांचे मार्गदर्शन यामुळे हा उपक्रम शहरातील चर्चेचा विषय ठरला.

# अवैध रेती वाहतुकीवर आय जी पथकांची व मुदखेड पोलिसांची पथकांची मोठी कारवाई

**सहा हायवा सहा जेसीपी अंदाजे चार कोटी तेरा लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल मुदखेड च्या पोलिसांच्या ताब्यात**





**मुदखेड (समर्थ गांवकरी)**

मुदखेड तालुक्यात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात खऋ पथक व मुदखेड पोलिसांनी संयुक्तपणे मोठी कारवाई केली या कारवाईत पोलिसांनी एकूण ०६ हायवा आणि ०६ जेसीबी यांचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेल्या वाहनांसह अंदाजे ४ कोटी १३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. या धडक कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

मुदखेड तालुक्यातील महाटी परिसरात तसेच महाटी-माळकौठा रस्त्यावर अवैध रेती वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे ०९ ऑक्टोबरच्या रात्री पोलिसांनी धडक कारवाई करत रेती वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी वाहने व यंत्रसामग्री जप्त केली.

नव्याने पोलीस निरीक्षक पदाचा पदभार स्वीकारलेले पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली. वाहतुकीसाठी आवश्यक परवानग्या व कागदपत्रांची तपासणी केली असता, संबंधित वाहनांकडे वैध परवानगी नसल्याचे निष्पन्न झाल्यानंतर वाहनांना ताब्यात घेतले आहे

या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या वाहनांमुळे अवैध रेती वाहतुकीच्या व्यवहारांना मोठा धक्का बसला आहे. संबंधित प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू असून, अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीविरोधात यापुढेही कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

मुदखेड शहर व तालुक्यात कायदा-सुव्यवस्था राखण्यासोबतच अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांनी उचललेल्या या पावलाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे. नव नियुक्त पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांवर वचक निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.सदर कार्यवाही आय जीच्या पथकासोबत मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कराड व त्यांचे पथकात जमादार मुंडे, चक्रधर कमलाकर, आदींनी कारवाई केली यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे

अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात पोलिसांची कठोर भूमिका पुढील काळातही सुरुच राहणार असल्याचे नुतन पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी सांगितले.

# राधाबाई काळे महिला महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा सप्ताह उत्साहात साजरा

**भारतीय चित्रपट सृष्टीत मराठी झेंडा रोवणारे दिवंगत अभिनेता नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण**

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेचे राधाबाई काळे महिला महाविद्यालय, मराठी विभाग अहिल्यानगर व महाराष्ट्र राज्य साहित्य परिषद, पुणे ,शाखा अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्या श्रीमती मीनाताई जगधने होत्या, तर प्रमुख व्याख्यात्या म्हणून डॉ. योगिता रांधवणे उपस्थित होत्या.

भारतीय चित्रपट सृष्टीत मराठी झेंडा रोवणाऱ्या आणि नाट्य कला व साहित्याची सेवा करणारे नुकतेच दिवंगत अभिनेता नाना पाटेकर यांना यावेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती मीनाताई जगधने यांचा परिचय मसाप, अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष श्री. ज्ञानदेव पांडुळे यांनी करून दिला. प्रास्ताविकातून त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

तसेच प्रमुख व्याख्यात्या डॉ. योगिता रांधवणे यांचा परिचय प्रा. सतीश शिर्के यांनी करून दिला. अध्यक्षीय सूचनेचे वाचन प्रा. अनिल जाधव यांनी केले तर या सूचनेला श्री. राजेंद्र चोभे यांनी अनुमोदन दिले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर थोपटे यांनी आपल्या मनोगतात मराठी भाषेचा वारसा केवळ साहित्यापुरता मर्यादित नसून तो आपल्या सामाजिक आणि वैचारिक जीवनाशीही जोडलेला आहे, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्रीमती मीनाताई जगधने यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात आधुनिक साहित्यिकांनी सामाजिक परिवर्तनाचे विचार मांडून मराठी भाषेला नवे आयाम प्राप्त करून दिल्याचे नमूद केले. तसेच विद्यार्थिनींमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांची वाचनसंस्कृती विकसित व्हावी, यासाठी महाविद्यालयात स्वतंत्र ‘वाचन मंच’ सुरू करण्याची सूचना त्यांनी केली.

प्रमुख व्याख्यात्या डॉ. योगिता रांधवणे यांनी आपल्या व्याख्यानातून मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. मराठी भाषा ही आपली सांस्कृतिक ओळख असून तिचे जतन आणि संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे त्यांनी सांगितले. मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करून ती समृद्ध करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच मराठी विषयाच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या करिअरच्या विविध संधींची माहिती देऊन विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

श्रीमती मीनाताई जगधने यांना नुकताच ग्रीन वर्ल्ड संस्थेचा ‘डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणरत्न पुरस्कार’ प्राप्त झाल्याबद्दल राधाबाई काळे महिला महाविद्यालयासह विविध संस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास मा. प्राचार्य श्री. विश्वासराव काळे,प्राचार्य डॉ. मनोहर करांडे श्री. राजेंद्र उदागे, श्री. शिवाजी साबळे, श्री. राजेंद्र चोभे, श्री. तोरणे, श्री. शिवाजी लंके, श्री. अनभुले, श्री. इम्रान तांबोळी, सौ. कविता शिंदे तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अहिल्यानगर शाखेचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भूपेंद्र निकाळजे, डॉ बाळासाहेब मुंडे, डॉ. रूपाली मालकर, डॉ. मंजुश्री भागवत, प्रा. भक्ती तांबे आणि प्रा.गणेश शिंदे यांचीही या वेळी उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी मराठी विभागप्रमुख डॉ. सचिन कोतकर, डॉ. शुभांगी दांगट तसेच मराठी विभागाच्या विद्यार्थिनी कु. प्रीती चक्रनारायण, कु. दीक्षा गायकवाड, कु. सायली लावांडे आणि कु. आरती देवकर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागातील प्रा. गीतांजली खाडे यांनी केले, तर श्री. शिवाजी साबळे यांनी आभार मानले.

# नेवासा व खडका परिसरातील बंधारे आवर्तनातून भरा!

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

**नागझिरी ओढ्यावरील बंधारे भरण्याची शेतकऱ्यांची मागणी; पाणीटंचाईमुळे शेती संकटात**

यावर्षी निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे नेवासा व खडका परिसरातील शेतकरी गंभीर संकटात सापडले आहेत. परिसरात पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याची समस्या निर्माण झाली असून, शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नागझिरी ओढ्यावरील तसेच परिसरातील बंधारे पाटपाण्याच्या आवर्तनातून तातडीने भरून द्यावेत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

नेवासा व खडका परिसरातील नागझिरी ओढ्यावरील बंधारे भरल्यास परिसरातील शेतीला मोठा दिलासा मिळू शकतो. या बंधाऱ्यांच्या खालील सुमारे ५०० ते ७०० एकर शेतजमीन असून, जवळपास ४०० शेतकऱ्यांची शेती या पाण्यावर अवलंबून आहे. सध्या पाण्याअभावी शेतीची परिस्थिती गंभीर बनली असून, पिके वाचविण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे. दरम्यान, पाटपाण्याचे आवर्तन सुरू असताना पाणी वाया जात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे संबंधित लोकप्रतिनिधी व पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन नागझिरी ओढ्यावरील बंधारे तातडीने आवर्तनातून भरून द्यावेत, अशी मागणी आ. लंघे यांच्याकडे करण्यात आली.

# पोखरकरवाडीत खाणकामाच्या परवानगीसाठी बनावट ठराव सादर केल्याचा आरोप; दोघांवर गुन्हा

**मंचर (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील पिंपळगाव घोडे ग्रामपंचायतीअंतर्गत पोखरकरवाडी येथील गट क्रमांक २३ मधील खाणकाम व्यवसायाच्या परवानगीसाठी बनावट ग्रामसभा ठराव तयार करून तो शासकीय कार्यालयात सादर केल्याच्या आरोपावरून दोघांविरुद्ध घोडेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरण गुलाब पोखरकर (रा. पोखरकरवाडी) आणि जयदीप नितीन काळे (रा. घोडेगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

याप्रकरणी ग्रामपंचायत अधिकारी

सुधीर अनिल चासकर (वय २५, रा. चास कमान, ता. खेड) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधितांनी खाणकाम व्यवसायासाठी परवानगी मिळण्याबाबत केलेला अर्ज २२ डिसेंबर २०२५ रोजी मागे घेतला होता. तसेच, २४ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या ग्रामसभेत खाणकामासाठी कोणत्याही प्रकारची परवानगी न देण्याचा ठराव करण्यात आला होता.

असे असतानाही संबंधित दोघांनी संगनमत करून २४ डिसेंबर २०२५ रोजीचा बनावट ठराव तयार केला. त्यावर ग्रामपंचायतीचा बनावट शिक्का मारून फिर्यादी ग्रामपंचायत अधिकारी सुधीर चासकर आणि सरपंच सायली लाडके यांच्या खोट्या सह्या केल्याचा आरोप आहे. हे कागदपत्र खरे असल्याचे भासवून आंबेगाव तहसील कार्यालयात सादर केले आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून खाणकामाची परवानगी मिळवून ग्रामपंचायत व शासनाची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटरच्या शैक्षणिक सहलीसाठी निळवंडे शाळेतील तीन विद्यार्थ्यांची जिल्हास्तरावर निवड

## अक्षरा पवार, पूनम आहेर व सुजय आहेर यांची चमकदार कामगिरी; जिल्हास्तरीय परीक्षेसाठी पात्र

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटर, (थुंबा) केरळ या शैक्षणिक सहलीच्या तालुकास्तरीय निवड परीक्षेत जि. प. प्राथमिक शाळा निळवंडेच्या तीन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

तालुकास्तरीय परीक्षेत उज्वल कामगिरी करत अक्षरा शाम पवार, पूनम गणेश आहेर, सुजय दत्तात्रय आहेर यांनी जिल्हास्तरीय परीक्षेसाठी पात्रता मिळवली आहे.तालुकास्तरीय परीक्षेत अक्षरा शाम पवार (इयत्ता पाचवी) व पूनम गणेश आहेर यांनी प्रत्येकी १७२ गुण, सुजय दत्तात्रय आहेर (इयत्ता सहावी) याने १७० गुण मिळवून दमदार कामगिरी केली. त्यांच्या या यशामुळे निळवंडे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, विज्ञान व संशोधनाची गोडी निर्माण व्हावी तसेच वैज्ञानिक क्षेत्रातील विविध संधींची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, या उद्देशाने जिल्हा परिषदेमार्फत दरवर्षी ही परीक्षा आयोजित केली जाते. या परीक्षेतून अंतिम निवड झालेल्या विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या वतीने स्वखर्चाने विमान प्रवासाची संधी देत केरळ येथील डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटर शैक्षणिक सफर घडवून आणली जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अवकाश विज्ञान व संशोधनाच्या क्षेत्राशी प्रत्यक्ष परिचय होण्याची अनोखी संधी मिळते.

या यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक रमेश निघुते यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे वर्गशिक्षक मंदा कडलग, अनिल कडलग, तुषार फल्ले, संजय एरंडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेतील शिक्षक कैलास दिघे, सौदामिनी सोनवणे, अनिल गाडेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय आहेर, उपाध्यक्ष उत्तम पवार, गावचे सरपंच शशिकला पवार, उपसरपंच भाऊसाहेब आहेर, तंटामुक्तीचे अध्यक्ष शिवाजी आहेर, पालक भाऊसाहेब वारे, नानासाहेब केरे, शाम पवार, सुनीता आहेर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी कैलास भागवत, केंद्रप्रमुख आशा घुले





तसेच गावातील शिक्षणप्रेमी नागरिक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

पालकांच्या प्रतिक्रिया –

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी अवकाश विज्ञानाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल प्रेरणादायी असून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांनी घेतलेले परिश्रम विशेष उल्लेखनीय आहेत. निळवंडे शाळेतील या गुणवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. रावसाहेब विश्वनाथ पवार व विलास मारुती पवार पालक व शिक्षणप्रेमी नागरिक आमच्या जिल्हा परिषदेच्या निळवंडे शाळेत सर्व स्पर्धा परीक्षांना मुलांना चांगले मार्गदर्शन केले जाते. शिक्षक प्रत्येक सुट्टीच्या दिवशी व रविवारी स्वतःचा मौलिक वेळ देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. त्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षा, नवोदय परीक्षा, मंथन, ओलिंपियाड परीक्षांमध्ये विद्यार्थी जिल्हा स्तरावर चमकत आहेत. त्याचबरोबर क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये मुलांनी शाळेचा झेंडा जिल्हापार नेलेला आहे. अशा शाळेत आमची मुले शिकतात याचा आम्हाला अभिमान आहे. सोमनाथ भागवत आहेर व बाळकृष्ण गायकवाड सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती, निळवंडे.